PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 1

# वाङ्‌मयेतिहास व समीक्षा

**श्री वैजिनाथ राख**
शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय
वडगाव बु पुणे ४६
**[महाराष्ट्र] भारत**

वाङ्‌मयेतिहास व समीक्षा या दोन्ही गोश्टी काहीषा एकमेकांपासून वेगळ्या वाटणाऱ्या व कधी-कधी काही गोश्टींच्या बाबतीत एकमेकांच्या समांतर जाणाऱ्या अषा आहेत. द. दि. पुंडे म्हणतात की, "समीक्षेपेक्षा वाङ्‌मयेतिहास हे पूर्णपणे वेगळे अभ्यासक्षेत्र आहे. ही संकल्पना अषी रुजने गरजेचे होते. कारण वाङ्‌मयेतिहासाची एकूण ध्येय धोरणेच वाङ्‌मयीन समीक्षेपेक्षा वेगळी असतात."1 हे म्हणणे एका मर्यादेपर्यंत बरोबर वाटते. कारण समीक्षक समीक्षा करताना तो त्या वाङ्‌मयाबद्दल बोलत असतो. पुन्हा ते म्हणतात की, "वाङ्‌मयेतिहास या संज्ञेतील इतिहास हे पद महत्त्वाचे आहे. कोणताही इतिहास हा द्वैकालिक असतो. समीक्षा अषी द्वैकालिक असू षकत नाही. समीक्षा एककालिक असते."2 या म्हणण्याला काही अर्थ नसून, हे बरोबर वाटत नाही. कारण वाङ्‌मयेतिहास द्वैकालिक असतो, हे बरोबर आहे. परंतु समीक्षा ही एककालिक असते, हे म्हणणे तितकेसे संयुक्तिक वाटत नाही. कारण समीक्षक असो वा वाङ्‌मयेतिहासकार, तो आपल्याला हवे त्या पद्धतीनेच एखाद्या घटकांची व वाङ्‌मयाची समीक्षा करीत असतो. तो ज्या काळात वावरलेला आहे, त्याच्या काळातील ज्या धारणा, प्रेरणा असतील, त्यानुसारच तो त्या वाङ्‌मयाची समीक्षा करेल. वाङ्‌मयेतिहासकारही आपल्याच नजरेने वाङ्‌मयेतिहासाकडे पाहत असतो. तो "आपल्या वर्तमानकालीन जाणिवा-संवेदना जषा असतील तषा स्वरूपाचा वाङ्‌मयेतिहास वाङ्‌मयेतिहासकाराला हवा असतो."3

त्यामूळे द. दि. पुंडेंचे समीक्षा ही एककालिक असते, हे म्हणणे तितकेसे बरोबर वाटत नाही. समीक्षक वाङ्मयाची समीक्षा करीत असताना सर्वच काळाचा विचार करीत असतो, असे म्हणावेसे वाटते. 'ज्ञानेष्वरी' ची समीक्षा करीत असताना ती ज्याकाळात निर्माण झाली, त्याचा विचार केलेलाच दिसतो. तत्कालीन धारणा-प्रेरणा-प्रवृत्ती ही समीक्षकांनी दाखवून दिल्या आहेत. परंतु त्यामध्ये भूत-वर्तमान-भविश्यासाठी, दया, क्षमा, षांती, सत्य व अहिंसा ही चिरकाल टिकणारी मूल्ये कषी उपयोगी आहेत, हे ही दाखवून दिलेले आहे, असे दिसते.

वाङ्मयेतिहासलेखनामध्ये सर्वात महत्त्वाची गोश्ट म्हणजे समीक्षा होय. यामध्ये समीक्षेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जर एखाद्या गोश्टीची समीक्षाच जर झाली नाही, तर इतिहास अतार्किकतेकडे जाईल. समीक्षा वाङ्मयातील प्रेरणा, प्रवृत्ती, धारणा व त्यावरील परिणाम व प्रभाव या गोश्टी दाखवून देण्याचे काम करीत असते. ती जर झाली नसेल, तर तो इतिहास हा खऱ्या समाजाच्या प्रज्ञेचा इतिहास होणार नाही. त्यासाठी वाङ्मयाची वेळोवेळी आणि वेगवेगळ्या कालखंडांत समीक्षा होणे गरजेचे असते.

समीक्षा ही वाङ्मयेतिहासलेखनाची समांतर प्रक्रिया आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण वाङ्मयेतिहासामध्ये नेहमी बदल होत असतो, हे परिवर्तन व बदल दाखवून देण्याचे काम सक्षम समीक्षा करीत असते.

मध्ययुगीन वाङ्मयेतिहासाबद्दल बोलायचे म्हटले, तर यामध्ये सुरुवातीचा वाङ्मयेतिहास व नंतरच्या काळातील वाङ्मयेतिहास यामध्ये बराच बदल झालेला दिसतो. 'संताळ्यांनी देष बुडविला' असे वि. का. राजवाडे यांनी सुरूवातीला म्हटले. परंतु त्यांच्या या भूमिकेत नंतर बदल झालेला दिसतो. नंतर तेच म्हणतात की, संतांनी धर्मरक्षणाचे काम केले, इतर समीक्षकही असेच म्हणतात. न्या. रानडे, 'मराठी सत्तेचा उदया'मध्ये ही संतांनी संस्कृतीरक्षणाचे व धर्मरक्षणाचे काम केले आहे म्हणतात. असेच मत गं.बा.सरदार यांनी 'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' मधून व्यक्त केले आहे. हे सर्व कषामुळे झालेले आहे, तर एका चांगल्या समीक्षेमुळे.

समीक्षेची दुसरी बाजू अषी की, समीक्षक ज्या काळातील असतो, त्या काळातील ज्या धारणा-प्रेरणा-प्रवृत्ती असतात, त्यांचा परिणाम त्याच्यावर झालेला असतो. तो त्यापासून निरपेक्ष राहू षकत नाही. कितीही तटस्थतेच्या माध्यमातून तो समीक्षा करीत का असेना, परंतु त्याच्या काळातील गोश्टी त्यात येतातच. मग मध्ययुगीन वाङ्मयाकडे पाहिले, तर या वाङ्मयाच्या प्रेरणा, प्रवृत्ती, धारणा, वैषिश्ट्यो, स्वरूप, व्याप्ती सर्व वेगळे दिसतात. या वाङ्मयाला जर आजच्या काळातील कसोट्या लावून किंवा आजच्या विचारांनी प्रभावित समीक्षकांनी समीक्षा केली, तर ती पाहिजे तेवढी सक्षम होणार नाही. त्यातील एखादी बाजू समोर येण्यास तरी मदत होईल काय? म्हणजे धर्मप्रेरित वाङ्मय आजच्या काळासाठी उपयोगी आहे का? त्याचा आज काय उपयोग? त्यामध्ये आजची जीवनमूल्ये व वाङ्मयीनमूल्ये सापडतात का? हे यातून समजणार नाही. त्यातून त्या वाङ्मयाचा वाङ्मयेतिहास अतिषय दर्जेदार व चांगला होणार नाही.

एकूणच असे म्हणावेसे वाटते की, समीक्षा हा वाङ्मयेतिहास लेखनातील महत्त्वाचा घटक आहे. तसेच समीक्षा ही संषोधनाच्या जवळ जाणारी असते, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. कारण वाङ्मय हे कोणत्या काळातील आहे. प्रदेष, भूगोल, लेखक कोण? कसा? इ. अनेक प्रष्नांना समीक्षा वाचा फोडत असते. यामुळे असे म्हणता येईल की, समीक्षेमुळे वाङ्मयेतिहास लिहिण्यासाठी मोठी मदत होते. याचा अर्थ समीक्षा ही संषोधनाकडे झुकते असा काढता येईल

## संदर्भ

1. द. दि. पुंडे, 'वाङ्मयेतिहास : आठ निबंध',प्रतिमा प्रकाषन, पुणे, 2003 पृ.14

2. तत्रैव, पृ. क्र. 14.

3. तत्रैव, पृ. क्र. 19